नि.दि.मु.नं. ४०/ २०१३
निशाण नं. १२८ लगत
CNR No.: MHSI05-000216-2013

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकिल श्री. आर. एस. गव्हाणकर यांचे मार्फत-**

या दाव्यामध्ये किती परिशिष्टे आहेत व किती मिळकती सामिल आहेत हे मी सांगु शकतो. या दाव्यात एकूण तीन मिळकती आहेत. या दाव्यात एकूण पाच परिशिष्टे आहेत. मी १२वी अनुत्तीर्ण आहे.

२. माझा दावा हा दिनांक २०/०२/२००९ रोजीच्या मृत्यूपत्राआधारे मला दावा मिळकतींमध्ये हक्क मिळावा व वाटप मिळावा यासाठी आहे. कथीत मृत्युपत्र अस्तित्वात असल्यामुळे माझा दावा मिळकतीमध्ये हक्क आहे असे माझे म्हणणे आहे.

३. माझे घराण्याचे मुळ पुरुष हे विठ्ठल आप्पा माळकर आहेत. त्यांना दोन पत्नी होत्या. रुक्मीणी ही पहिली पत्नी असून तिला मुलबाळ नव्हते. ती मयत झाली. दुसरी पत्नी साजुबाई ती देखील मयत झाली. जेव्हा विठ्ठल आप्पा माळकर यांनी दुसरे लग्न केले तेव्हा पहिली पत्नी रुक्मीणी ही जिवंत होती. विठ्ठल आप्पा माळकर यांना एकूण ३ मुलगे व १ मुलगी होती. त्या मुलीचे नाव पिरताबाई असे होते. तीचे लग्न झाले. ती मयत झाली. तिला १ मुलगा २ मुली आहेत. मुलाचे नाव चंद्रकांत, मुलीचे नाव माधवी व तृप्ती असे आहे. जेव्हा मी दावा दाखल केला त्यावेळी पिरताबाई यांचे पती जिवंत होते. चंद्रकांत, माधवी व तृप्ती हे सर्व हयात आहेत. हे तिघेही सदर दाव्यात सामिल आहेत. हे म्हणणे खरे आहे की विठ्ठल आप्पा माळकर यांना तीन मुले आहेत. त्यांची नावे नारायण, सदाशिव व गुंडु अशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की गुंडु अविवाहीत मयत झाले. माझे म्हणण्याप्रमाणे ते विवाहीत होते. गुंडुच्या पत्नीचे नाव गुणवंती होते. ती मयत झाली. त्यांना एकूण पाच मुले आहेत. त्यापैकी तीन मुलगे व दोन मुली आहेत. आजरोजी एकूण पाच मुले- मुली हयात आहेत. सन २००२ मध्ये नारायण मयत झाले. दिनांक ८/१/२०११ रोजी सदाशिव हे मयत झाले. सदाशिव उर्फ महादेव हे अविवाहीत होते. नारायणच्या पत्नीचे नाव लक्ष्मी होते. ती सन १९७० मध्ये मयत झाली. या दाव्यातील प्रतिवादी नं. १ हे माझे वडिल आहेत. माझे वडिलांना धरुन एकूण पाच भावंडे व एक बहीण आहे. त्यांची नावे तुकाराम, अशोक, कृष्णा, गणपत व मंदाकिनी अशी आहेत. माझे वडिलांना मला धरुन एकूण तीन मुले आहेत. माझे भावांची नावे उमेश व महेश अशी आहेत. आम्हाला सख्खी बहीण नाही. मी सर्व भावंडामध्ये धाकटा आहे. मी नोकरी करीत नाही. मी गावी रहायला आहे. वयाच्या ८२ व्या वर्षी सदाशिव उर्फ महादेव हे मयत झाले. माझे वडिल मनोहर हे नोकरीनिमित्त प्राथमिक शिक्षक म्हणुन बाहेरगावी होते. माझे वडिलांनी निवृत्त होईपर्यंत काम केले. सिंधुदुर्ग जिल्हा अस्तित्वात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर माझे वडिल नोकरीला लागले किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. माझा जन्म मातोंड गावी झाला. नोकरीच्या कालावधीत माझे वडिलांची कमीत कमी सात ते आठ वेळा बदली झाली होती. माझे वडिलांनी नोकरी सोडून ते

गावी राहिले असे कधी घडले नाही.  माझे व प्रतिवादी नं. १ चे संबंध चांगले आहेत.  मी व प्रतिवादी नं. १ अजुनही एकत्रीत आहोत.  हे म्हणणे खरे आहे की मी माझे वडिलांना प्रतिवादी नं. १ म्हणुन या दाव्यात सामिल केले आहे.  प्रतिवादी नं. १ यांनी त्यांचे म्हणणे सदर दाव्यात मांडले आहे.  प्रतिवादी नं. १ ने माझा दावा मान्य केलेला आहे.  प्रतिवादी नं. ६ ही माझी आत्या आहे.  माझे दाव्यात एकूण १४ प्रतिवादी आहेत.

**उवरीत  उलटतपास प्रतिवादीतर्फे वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर  स्विकृत.

सही/–
(के.के.पाटील)
दिनांक–  १०/१२/२०२१.  दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.